आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, ६ जुलै २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ३७ । पाने : ४ । मूल्य २ ₹

### तुकोबा-ज्ञानोबा माऊलींच्या पालखींचे पंढरीकडे प्रस्थान

पुणे : 'तूं माझी माऊली, तूं माझी साउली, पाहतो वाटुले पांडुरंगे' अशी आस मनात बाळगून आषाढी वारीनिमित्त संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांचे मोजक्या वारकऱ्यांच्या उपस्थितीत प्रस्थान झाले. 'प्रेमाचा जिव्हाळा, आरोग्य सांभाळा, हेचि सांगतसे, माझा विठू सावळा' असा संदेश सोहळ्याने दिला.



# धक्काबुक्की प्रकरणी भाजपच्या डझनभर आमदारांचे एक वर्षासाठी निलंबन

प्रतिनिधी

मुंबई : विधानसभा सभागृहात गोंधळ घालतानाच तालिका अध्यक्ष भास्कर जाधव यांच्याशी गैरवर्तन केल्याप्रकरणी भाजपच्या तब्बल १२ सदस्यांना विधानसभेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यात आशिष शेलार, गिरीश महाजन, जयकुमार रावल, संजय कुटे या माजी मंत्र्यांचाही समावेश आहे.

विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सोमवारी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणाशी संबंधित एक ठराव मांडला. केंद्र सरकारकडून इम्पिरिकल डेटा मिळवण्यासंबंधी हा ठराव होता. त्यास भाजपच्या सदस्यांनी जोरदार विरोध केला. त्यावेळी काही सदस्यांनी सभागृहात गोंधळ घातला. तालिका अध्यक्षासमोरचा माइक व राजदंड पळवण्याचा प्रयत्न करण्यात आला. सभागृह तहकूब झाल्यानंतरही हे सदस्य शांत झाले नाहीत. त्यांनी अध्यक्षांच्या दालनातही गोंधळ घातला. अध्यक्षांना शिवीगाळ केली. स्वत: तालिका अध्यक्षांनी ही माहिती देत तीव्र नाराजी व्यक्त केली. भाजप सदस्यांच्या या गैरवर्तनाची गंभीर दखल घेत सत्ताधारी पक्षानं निलंबनाचा ठराव आणला. संसदीय कामकाज मंत्री अनिल परब यांनी हा ठराव मांडला. हा ठराव आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. त्यानुसार, भाजपच्या १२ सदस्यांना एक वर्षासाठी सभागृहातून निलंबित करण्यात आले आहे. त्यात संजय कुटे, आशिष शेलार, अभिमन्यू पवार, गिरीश महाजन, अतुल भातखळकर, पराग अळवणी, हरीश पिंपळे, राम सातपुते, जयकुमार रावल, योगेश सागर, नारायण कुचे, किर्तिकुमार भांगडिया यांचा समावेश आहे. निलंबित सदस्यांना पुढील वर्षभर मुंबई व नागपूर विधिमंडळाच्या आवारात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे.



ॲड.आशिष शेलार


डॉ.गिरीश महाजन


जयकुमार रावल


डॉ.संजय कुटे



अभिमन्यू पवार


अतुल भातखळकर


पराग अळवणी


हरीष पिंपळे


राम सातपुते


योगेश सागर


नारायण कुचे


कीर्तिकुमार भांगडिया

### हा तर लोकशाहीचा खून : देवेंद्र फडणवीस

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी या कारवाईचा निषेध केला. 'भाजपच्या सदस्यांच्या निलंबनाचा ठराव म्हणजे विरोधकांचे संख्याबळ जाणीवपूर्वक कमी करण्याचा डाव आहे. हा लोकशाहीचा खून आहे. काही सदस्यांनी गैरवर्तन केले असेल तर अध्यक्षांनी त्यांच्याशी चर्चा करायला हवी. थेट निलंबन करणे योग्य नाही,' असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**बातमी व जाहिरातीसाठी संपर्क**

9423209823

मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# स्कूल चले हम..!

## कोविडमुक्त गावांना प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्यास शासन मान्यता

प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र शासनाने सोमवार दि.५ जुलै रोजी महत्त्वपूर्ण निर्णय घेत कोविडमुक्त गावांमध्ये इयत्ता आठवी ते बारावीपर्यंतचे प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्यास शाळा-महाविद्यालयांना मान्यता दिली आहे. याबाबतचे परिपत्रक जारी करून कोरोनाबाबतची नियमावली शैक्षणिक संस्थांना बंधनकारक राहणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यातील कोविडमुक्त क्षेत्रातील पहिल्या टप्प्यात इयत्ता आठवी ते इयत्ता बारावीचे वर्ग सुरक्षितपणे सुरू करण्यासाठी मार्गदर्शक सूचना सोमवारी राज्य शासनाकडून काढण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाने राज्यातील कोविडमुक्त भागाती इयत्ता आठवी ते इयत्ता बारावीचे वर्ग सुरू करण्याच्या दृष्टीने सोमवारी एक महत्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे.

राज्य शासनाने यासंदर्भात एक परिपत्रक काढून शासन निर्णय जाहीर केला असून, कोरोनामुक्त क्षेत्रातील ग्रामपंचायती व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठरावने शासन निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात इयत्ता आठवी ते इयत्ता बारावीचे वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भात राज्य शासनाने काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, ग्रामीण भागात कोविडमुक्त गावातील ग्रामपंचायतीने त्यांच्या अखत्यारीत असणाऱ्या गावातील शाळेतील इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग सुरू करणेबाबत पालकांशी चर्चा करून ठराव करावा, शाळा सुरू करताना मुलांना टप्प्या-टप्प्यात शाळेत बोलविण्यात यावे, कोरोना संबंधी सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, संबंधीत शाळेतील शिक्षकांची राहण्याची व्यवस्था शक्यतो त्याच गावात करण्यात यावी किंवा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर न करण्याबाबत दक्षता घ्यावी.




### अशी असेल नियमावली

कोविडमुक्त गावातील आठवी ते बारावीचे वर्ग सुरू होणार, पालकांशी चर्चा करून ग्रामपंचायतीला ठराव आणावा लागेल. एका बाकावर एक विद्यार्थी तर दोन बाकांमध्ये सहा फूटांचे अंतर ठेवावे लागणार. एक वर्गात जास्तीत जास्त १५ ते २० विद्यार्थ्यांना बसण्यास परवानगी असणार, कोरोना संदर्भात कोणतीही लक्षणे आढल्यास विद्यार्थ्यांना घरी पाठण्यात येईल. त्यांना कोरोना चाचणी करणे अनिवार्य असेल. असेही सूचित करण्यात आलेले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### एमपीएससीच्या रिक्त जागा ३१ जुलैपर्यत भरणार : पवार

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत उत्तीर्ण होऊनही अद्याप नोकरी न मिळाल्यामुळे पुण्यातील स्वप्निल लोणकर या तरुणाने आत्महत्या केली.



स्वप्निलच्या आत्महत्येचे पडसाद राज्यभरात उमटले असतानाच विधिमंडळातही भाजपनं हा मुद्दा उपस्थित करत सरकारला घेरलं आहे. विरोधकांना उत्तर देताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एमपीएससीबाबत महत्त्वाची घोषणा केली आहे. ३१ जुलै २०२१ पर्यंत सर्व रिक्त पदे भरण्यात येतील, असे आश्वासन अजित पवारांनी दिले आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधकांनी एमपीएससीचा प्रश्न उपस्थित करत सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी स्पप्निल लोणकरच्या कुटुंबीयांना ५० लाखांची मदत देण्याची मागणी केली होती. यावेळी विरोधकांच्या आरोपांवर उत्तर देताना अजित पवारांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.

### एसबीआयच्या प्रबंधकपदी सुनिलकुमार चौधरी

माजलगाव : येथील बीड रोडवरील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुख्य प्रबंधकपदी सुनिलकुमार चौधरी यांची नियुक्ती झाली आहे. येथील स्टेट बँकेचे प्रबंधक संदीपकुमार यांची नुकतीच पुणे येथे बदली झाल्याने त्यांच्या जागी सुनिलकुमार चौधरी यांची नियुक्ती झाली. चौधरी यांनी परभणी, औरंगाबाद, नाशिक, पुणे, दिल्ली येथील शाखा प्रबंधकाचा भार यशस्वीपणे सांभाळला असून त्यांचा दांडगा अनुभव पाहता माजलगाव शाखेचा कारभार सुधारण्यास मदत होणार आहे.



### माजलगावात बालिकेवर अल्पवयीनचा अत्याचार

माजलगाव : शहराजवळील सिंदफणा नदीच्या पुलाजवळ शेतात काम करणाऱ्या शेतमजूरच्या चार वर्षाच्या चिमुकलीवर एका दुसऱ्या शेतमजुराच्या १४ वर्षीय मुलाने अत्याचार केल्याची घटना सोमवार, दि.५ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली असल्याचे पोलीस सूत्राने सांगितले. सदर बालिकेवर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही.







# दीन-दुबळ्यांच्या ताटात अन्नाचा घास

## मानवी हक्क अभियानतर्फे किराणा कीट वाटप

प्रतिनिधी

माजलगाव : दिवंगत ॲड.एकनाथराव आवाड यांच्या संकल्पनेतून उभा राहिलेल्या मानवी हक्क अभियान संघटनेने सामाजिक दायित्व दाखवत दीन-दुबळ्या गरीबांना किराणा कीटचे वाटप केले आहे. तब्बल एक महिन्याचे किराणा साहित्य वाटप करून कोरोना काळात हताश झालेल्या गरीबांच्या ताटात अन्नाचा घास पुरविण्याचे काम संघटनेने केले आहे.

बीड जिल्ह्यात मार्च महिन्यापासून कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन सुरू झाले. या लॉकडाऊनमुळे ऊसतोड कामगार, बेरोजगार व कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे अडचणीत सापडले. हाताला काम नसल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. ऊसतोड कामगारांना ऊसतोडीवरून परत येताच लॉकडाऊनचा सामना करावा लागला. त्यामुळे मुलांना पालनपोषण करण्याचा प्रश्न गंभीर बनला.

अशा अडचणीत सापडलेल्या कुटुंबाला मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ.मिलिंद आवाड यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील मालिपारगाव, पुरूषोत्तमपुरी, ब्रम्हगाव, राजेवाडी, डुकडेगाव, माणिकनगर, पुसरा अशा अनेक गावात एक महिन्याचे रेशन किट वाटप करण्यात आले. यामध्ये २५ किलो गव्हाचा आटा, १० किलो तांदूळ, २ किलो तेल, साखर, मिरची, मसुरदाळ, मुगदाळ, मीठ, हळद, साबण, सॅनिटाइजर, मास्क इत्यादी जीवनावश्यक वस्तूंच्या कीटचे वाटप करण्यात आले. जिल्हा अध्यक्ष राजेश घोडे, मोतीराम बडे, मानवी हक्क अभियानचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, दत्ता आवाड, परमेश्वर अडागळे, अशोक लोंढे, महादेव उमाप, बंडू खंडागळे, साहेबराव आवाड, दगडू लोखंडे, विष्णू मुजमुले, शरद लोखंडे, बाबा थोरात, रोहित आवाड, बाबा मुजमुले अशा अनेक कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाचे नियोजन करुन कष्टकरी, गरीब, विधवा महिला, अपंग यांना आधार देण्याचे काम केले.



## संपादकीय

# अर्थव्यवस्थेची घडी बसतेय!

कोरोना काळात देशाची आर्थिक घडी डळमळीत झाली असताना केंद्राने वेगवेगळे उपाय करून आर्थिक बाजू भक्कम करण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत. गेल्या वर्षापासून संकटात असलेली भारतीय अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्याची चिन्हे दिसायला लागली आहेत. गेल्या तीन आठवड्यांमधली आकडेवारी अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी आहे. देशात जूनमध्ये कोरोनाची दुसरी लाट ओसरायला लागली आहे. टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठवली जात आहे. अर्थचक्राला पुन्हा गती येत आहे. तीन प्रमुख संशोधन संस्थांच्या साप्ताहिक आकडेवारीनुसार, हेच चित्र दिसत आहे. यूबीएस इंडिया ॲक्टिव्हिटी इंडिकेटरने १३ जून रोजी संपलेल्या आठवड्यात उच्चांक गाठला. कोरोना प्रकरणांमध्ये वाढ झाल्याने २३ मे रोजी संपलेल्या आठवड्यात या इंडिकेटरने नीचांकी पातळी गाठली होती. त्याचप्रमाणे क्वांटेको रिसर्चचा डेली ॲक्टिव्हिटी ॲण्ड रिकव्हरी ट्रॅकर (डीआरटी) सूचित करतो की, १३ जून रोजी संपलेला आठवडा ध्यानी घेता सलग चौथ्या आठवड्यात आर्थिक व्यवहार सुधारले आहेत. नोमुराचा बिझनेस रिज्युम्शन इंडेक्स तिसऱ्या आठवड्यात आर्थिक व्यवहारात पूर्वस्थिती येत असल्याचे दर्शवत होता. गुगल मोबिलिटी इंडेक्स, पल ड्रायव्हिंग इंडेक्स आणि रेल्वे प्रवाशांकडून मिळणारे दैनंदिन उत्पन्न यांसारखे निर्देशक देखील जूनमध्ये पूर्वपदावर येत असल्याचे दर्शवत आहेत. जूनच्या पहिल्या १५ दिवसांमध्ये ई–वे बिले आणि आयातीमधली वाढदेखील आर्थिक घडामोडींमध्ये स्थिर सुधार दर्शवत आहे. अर्थतज्ज्ञ तन्वी गुप्ता जैन म्हणतात की, २०20च्या व्ही–शेप रिकव्हरीच्या विपरीत आम्ही भारतासाठी हळूहळू पुनर्प्राप्तीची अपेक्षा करत आहोत. आर्थिक वर्षाच्या उत्तरार्धापर्यंत ग्राहकवर्ग आणि व्यावसायिकांचा आत्मविश्वास वाढेल, अशी अपेक्षा आहे. यापुढील काळात लसीकरणाला गती येण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोरोनावर नियंत्रण येईल. आता अर्थव्यवस्था पूर्वपदावर येण्यास सुरुवात झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या बुलेटिनमधल्या लेखात तसे म्हटले आहे. स्टेट ऑफ इकॉनॉमी' या लेखात कोविडच्या दुसऱ्या लाटेचा देशांतर्गत मागणीवर मोठा परिणाम झाला; आपल्याला कोरोनाबरोबर राहायला शिकावे लागेल, असे म्हटले होते. लसींच्या सहाय्याने आरोग्य सेवा आणि संशोधनात गुंतवणूक वाढवावी लागेल. रिअल इस्टेट क्षेत्रावर कोरोना साथीचा प्रतिकूल परिणाम झाला. व्यवसायातली गुंतवणूक आणि उत्पादकता आता वाढीस लागेल. शेती आणि पूरक उद्योगावर कोरोनाच्या लाटेचा फारसा परिणाम झाला नाही. अन्य क्षेत्रात नकारात्मक परिणाम झाला असला तरी शेती क्षेत्राने सातत्याने वाढ नोंदवली. आता कृषी आणि संपर्करहित सेवा सुधारत आहेत. औद्योगिक उत्पादन आणि निर्यातीत वाढ होत आहे. रिझर्व्ह बँकेने पतधोरण आढावा बैठकीनंतर म्हटले होते की, आर्थिक वर्ष २०२२–२३ च्या पहिल्या तिमाहीत म्हणजेच एप्रिल ते जून या तिमाहीत वास्तविक जीडीपी वाढ १८.५ टक्के होईल. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्षात जीडीपीमध्ये ९.५ टक्के वाढीचा अंदाज वर्तवला आहे. देशाची वित्तीय तूटही अपेक्षेपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. याला मोठ्या प्रमाणात होणाऱ्या करसंकलनामुळे अशी स्थिती निर्माण होईल. कोरोनाकाळात देशाला करसंकलनाचा चांगलाच हातभार लाभत आहे. दोन महिन्यांपूर्वी जीएसटीचे संकलन विक्रमी पातळीवर पोहोचले होते. आता थेट करसंकलन वाढल्याने सरकारला महागाई आणि महामारीच्या काळात चांगलाच दिलासा मिळाला आहे. पगारदारांसारखे व्यक्तिगत करदाते, अग्रिम कर भरणारे व्यावसायिक यांच्या जोरावर चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या अडीच महिन्यांमध्ये थेट प्रत्यक्ष करसंकलन वार्षिक तुलनेत दुप्पट नोंदले गेले आहे. कोरोना संसर्ग नियंत्रणात येत असताना तसंच अनेक भागांमध्ये टाळेबंदीचे निर्बंध शिथिल होत असताना अर्थव्यवस्था रूळावर येत असल्याचे हे चिन्ह मानले जाते. सरकारच्या वाढीव महसुली उत्पन्नाने त्यावर शिक्कामोर्तब केल्याचे हे प्राथमिक चित्र आहे. यंदा १ एप्रिल ते १५ जूनदरम्यान सरकारच्या तिजोरीत निव्वळ प्रत्यक्ष करापोटी एक लाख ८५ हजार ८७१ कोटी रुपये जमा झाले. आधीच्या, २०२०–२१ मधल्या याच कालावधीतल्या ९२ हजार ७६२ कोटी रुपयांच्या तुलनेत ही रक्कम जवळपास दुप्पट आहे. गेल्या अडीच महिन्यांमध्ये कंपनी प्राप्तिकरापोटी ७४ हजार ३५६ कोटी रुपये जमा झाले आहेत तर व्यक्तिगत प्राप्तिकर आणि रोखे व्यवहार कर एक लाख ११ हजार कोटी रुपयांवर पोहोचला आहे. परताव्याची रक्कम ३० हजार ७३१ कोटी रुपये आहे. प्राप्तिकरापोटी केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या प्रत्यक्ष महसुलामध्ये महाराष्ट्राचा वाटा सिंहाचा असून गेल्या सलग दोन वर्षामध्ये तो ३० टक्क्यांहून अधिक राहिला आहे. २०१८–१९ मध्ये देशभरातून चार लाख ६१ हजार ६४० कोटी रुपये कर जमा झाला. यामध्ये एकट्या महाराष्ट्रातून एक लाख ४१ हजार सहाशे कोटी रुपये कर जमा झाला. २०१९–२० मध्ये देशभरातून चार लाख ८० हजार २७६ कोटी रुपये कर जमा झाला. त्यात महाराष्ट्रातून एक लाख ५१ हजार २८५ कोटी रुपये कर जमा झाला होता. गेल्या दीड वर्षापासून भारतात कोरोना आणि त्यामुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे कॉर्पोरेट कर संकलनात मोठी घट झाली होती. देशात पहिल्यांदाच कॉर्पोरेट करापेक्षा वैयक्तिक करांचे संकलन वाढले आहे. एकूणच टाळेबंदी उठत असताना अर्थकारणाला वेग मिळत असून देशाच्या अर्थकारणाला बसलेली झळ कमी होण्याची शक्यता दिसत आहे. त्यामुळे नजिकच्या काळात अर्थव्यवस्था जागेवर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अर्थव्यवस्थेची घडी बसवताना सरकारने घेतलेले निर्णय विकासाच्या बाबतीत महत्त्वपूर्ण ठरताना दिसत आहेत.

# आनंदामागचं विज्ञान काय?

**आपण आयुष्यभर आनंद मिळवण्यासाठी झटतच रहातो. पण हाताला काहीच लागत नाही. पण आनंद मिळवलेल्या माणसांना तो कुठे सापडतो? आनंदामागचे हेच विज्ञान शोधण्यासाठी अमेरिकेतल्या मिशेल वॅक्स या तरुणीनं द हॅपिनेस प्रोजेक्ट' सुरू केला. त्यांनी स्वतःला आनंदी म्हणवणाऱ्या ५०० लोकांच्या मुलाखती त्यांनी घेतल्यात. त्यातून गवसले ते अमेरिकन हॅपिनेस' या डॉक्युमेंटरीतून आपल्यासमोर मांडले.**

विशेष

**रेणुका कल्पना**

सुखवाद ही तत्त्वज्ञानातली एक शाखा. या सुखवादाच्या सिद्धांतानुसार, जगात आनंद ही एकमेव साध्य मूल्य असलेली गोष्ट आहे. इतर सगळ्या गोष्टींना साधन मूल्य असतं. याचा अर्थ असा की बाकी सगळ्या गोष्टी आपण दुसरं काहीतरी मिळवण्यासाठी करत असतो. शाळा शिकतो ते नोकरी लागावी म्हणून. नोकरी करतो ते पैसे मिळावेत म्हणून. पैसे मिळवतो ते कुटुंबासाठी वेळ घालवता यावा म्हणून. आणि कुटुंब, त्यांच्यासोबतचा वेळ आपल्याला हवा असतो कारण त्याच्यातून आपल्याला आनंद मिळतो म्हणून. मैत्री, प्रेम, पैसे, छंद, प्रवास, लग्न, मुल झालंच तर धर्म, देव अशी जगातली कोणतीही गोष्ट आनंद मिळवण्यासाठीच केली जाते.

पण तरी आपण खरंच आनंदी असतो का? रोज सकाळी झोपेतून उठल्यावर उगवलेल्या दिवसाविषयीचं कुतूहल आपल्या मनात कधीच नसतं. याचा अर्थ आपण दुःखात असतो, असं नाही. पण आपण आनंदीही नसतो. एक वेगळ्या प्रकारची उदासीनता आपल्या सगळ्यांच्या जगण्याला व्यापून राहिलेली असते. पण जगात असं मलूल वातावरण असतानाही काही लोक मात्र स्वतःच्या आयुष्यात इंद्रधनुष्य फुलवतात. नेमकी कोण असतात ही माणसं? आनंदी राहण्यासाठी ती नेमकं काय करतात? त्यांचा रोजचा दिवस नेमका कसा असतो? हे शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या अमेरिकेतल्याच मिशेल वॅक्स या तरुणीनं द हॅपिनेस प्रोजेक्ट सुरू केला. आनंदी असण्याचं विज्ञान नेमकं काय असतं हे शोधण्यासाठी त्यांनी स्वतःला आनंदी म्हणवणाऱ्या, आनंद आतून अनुभवणाऱ्या लोकांच्या मुलाखती घेतल्यात. त्यातून समोर आलेल्या आनंदी लोकांच्या ४ महत्त्वाच्या सवयी त्यांनी फास्ट कंपनी' या अमेरिकन मासिकात मांडल्यात.

अस्वस्थतेचं खोदकाम

या लेखात दिलेल्या चित्रात हसणाऱ्या मिशेल यांचा आनंद किती मनातून आलाय हे त्यांना पाहिल्यावर लगेच कळतं. त्यांच्याकडे नुसतं पाहूनच आनंदी वाटू लागतं. लोकांच्या आनंदाचं मूळ शोधण्याची चटक मिशेल वॅक्स यांना लागली कारण त्या स्वतःच कधी आनंदी नव्हत्या. त्यांच्या आयुष्यात दुःख होती असं नाही. उलट, सगळं तर मस्त सुखात चाललं होतं. आनंदाच्या शोधयात्रेची सुरवात करण्याआधी त्या अन्न उद्योगात काम करत होत्या. लहानपणी पाहिलेलं कुकीची म्हणजे खास अमेरिकन बिस्किटांची कंपनी काढण्याचं स्वप्न त्यांनी मोठेपणी पूर्ण केलं. कुकी बनवण्याचा, ते विकण्याचा लघुउद्योग बोस्टनमधे चालू केला. त्यासोबतच आणखी एक फुड पॅकेजची कंपनी काढली. तीही मोठी केली. व्यावसायिक यशाच्या टोकावर त्या होत्या. या



टोकावर त्यांनी आनंदी असणं अपेक्षित होतं. फ्लरिश बाय बेको मॅनेजमेंट या युट्यूबचॅनेलवरच्या त्यांच्या मुलाखतीत त्या म्हणतात, आपल्याला लहानपणापासून एकच शिकवलं जातं. तुम्ही मेहनत केलीत, तुम्हाला काय हवं ते मिळवलं की तुम्ही आनंदी व्हाल. मी खरंच खूप मेहनत केली. मला हवं ते मिळवलं. पण तरीही मी रोज सकाळी उठायचे तेव्हा मला ठिक वाटायचं. सगळं बरं चाललंय असं वाटायचं. त्यात आनंद नव्हता. अपराधीपणाची भावना माझ्या मनात येऊ लागली. मी आनंदी असायला हवं असताना मला जे वाटतंय तसं नेमकं का वाटतंय याचं खोदकाम करायला मी सुरवात केली.'

समाजाच्या अपेक्षांचे ओझे

या अस्वस्थतेतूनच शेवटी २०१७ ला त्यांनी त्यांच्या दोन्ही कंपन्या विकल्या. एक जीप घेतली आणि अमेरिकेतल्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यात फिरू लागल्या. देशातली सगळी ५० राज्य धुंडाळून त्यांनी स्वतःला आनंदी म्हणवणाऱ्या ५०० लोकांच्या मुलाखती घेतल्या. त्यातून जे काही हाताला लागलं ते अमेरिकन हॅपिनेस' या डॉक्युमेंटरीतून जगासमोर मांडले. या डॉक्युमेंटरीत मिशेल म्हणतात, अमेरिकेतल्या प्रत्येक माणसाला आनंद हवा आहे. पण समाजाच्या अपेक्षा सतत आपल्याभोवतीच असतात. आपण कोण असलं पाहिजे, काय मिळवले पाहिजे आणि कसे जगले पाहिजे याचे ओझे या अपेक्षा आपल्याला देत राहतात. यातूनच आनंद हे क्षितीजासारखे बनते. आपण जितके त्याच्याकडे जायला लागू तितके ते लांब लांब जात राहते.' आपण आहोत त्या परिस्थितीत आनंदी कसं रहायचं हे कधीही कुणीही आपल्याला शिकवत नाही. मग समाजाच्या चौकटीत बसण्यासाठी आपण समोर येईल त्याला सामोरे जात जगत असतो. पण जगात काही माणसे खऱ्या अर्थाने आनंदी आहेत. ही माणसे सकाळी उठतात तेव्हा आयुष्याबद्दल भरपूर उत्साही असतात. जगण्यासाठीच सुंदर कारण त्यांच्याकडे सतत तयार असतं. ही माणसे नेमके असे काय करतात हे समजून घेण्याची ही वेळ आहे.' विमीयो या वेबसाईटवर ही डॉक्युमेंटरी पहायला मिळते. पण ती विकत घेण्यासाठी साधारण ११ डॉलर मोजावे लागतात. म्हणजे भारतीय ८९१ रुपये. भाड्यावर घ्यायची असेल तर ३ ते ४ डॉलर म्हणजे साधारण २९६ रूपये.

आनंदी माणसांच्या ४ सवयी

आपण नेहमी आनंदाची संकल्पना गुंतागुंतीची करून टाकतो. पण आनंद मिळवलेल्या लोकांशी बोलून आनंद ही अतिशय सोपी गोष्ट असल्याचं मिशेल फास्ट कंपनी मासिकात आलेल्या लेखात म्हणतात. या आनंदी लोकांच्या चार सवयी त्यांनी या लेखात सांगितल्यात. या सवयी आत्मसात केल्या तर आपण सगळेच दिर्घकाळ आनंदाच्या वाटेवर जाऊ शकू असे त्यांचे म्हणणे आहे.

१) आवडत्या गोष्टींची यादी

मनापासून आनंद मिळवण्यासाठी करायची पहिली गोष्ट म्हणजे आपला आनंद कशामुळे तयार होतो आणि कशामुळे नष्ट होतो हे समजून घेणं. आपल्याला कोणत्या गोष्टी आनंद देतात आणि कोणत्या गोष्टी तो हिरावून घेतात यांची यादी करता येईल. पण या यादीत लिहिलेल्या गोष्टी आपल्या नियंत्रणातल्या असतील याची काळजी घ्यायला हवी. एकदा का ही यादी झाली की आपल्याला आवडतात त्या गोष्टी करण्यासाठी जास्तीत जास्त वेळ कसा द्यावा याची आणखी करता येईल.

२) अर्थपूर्ण दिवस

आपलं ध्येय मिळवणं ही मोठी गोष्ट आहे. पण ध्येयप्राप्तीनंतर मिळालेलं समाधान क्षणभरच टिकतं. आपण खोलात जाऊन विचार केला तर ध्येयप्राप्तीपेक्षा त्या ध्येयाशी झालेल्या भावनिक गुंतवणूकीची भूक आपल्याला जास्त असते. त्यामुळे ध्येय मिळवल्यावरही अनेक लोक आनंदी दिसत नाही. आनंद हा एखाद्या स्नायू सारखा असतो. सतत व्यायाम केला, त्या स्नायूचा सतत उपयोग केला तरच तो तयार होतो. तसंच, आनंद मिळवण्यासाठीही रोज सकारात्मक विचारांचा व्यायाम करावा लागेल. आपल्याला ज्या भावनेसोबत रहायचं आहे त्या भावनेचे शब्द लिहून काढायला हवेत. उदाहरणार्थ, आज आपल्याला कसं वाटायला हवंय? शांत? मोकळं? उत्साही? की आनंदी? अशा शब्दांचीही यादी करायला हवी. आपल्याला ध्येय मिळाल्यानंतर कसं वाटायला पाहिजे त्या भावनेचे शब्द त्यात हवेत. यादी तयार झाली की आपली कृती, विचार आणि बोलणं या भावनांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करता येईल. आपण कोणताही निर्णय घेणार असतो तेव्हा या यादीकडे पाहून आपण यादीतल्या शब्दांप्रमाणे वागतोय का हे तपासून घेता येईल. याने आपला दिवस सकारात्मक आणि अर्थपूर्ण बनेल.

३) आपली सकाळ आपल्या मुठीत

आपली सकाळ एका सकारात्मक गोष्टीपासून सुरू करणं ही दिवसभराच्या आनंदावर परिणाम करणारी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. सकाळी उठल्या उठल्या कामं सुरू करण्याची घाई करण्याऐवजी किंवा आपला मोबाईल घेऊन सोशल मीडियावर स्क्रोल करण्याऐवजी स्वतःसाठी एक मिनिटभर बाजूला काढायला हवा. पुढचे काही तास काय करायचं याचं नियोजन करता येईल. आपल्याला काय पूर्ण करायचंय, कसं पूर्ण करायचंय आणि कोणत्या भावनेने करायचंय हे ठरवायला हवं. दिवसभर पटकन राग येत बसणं, दुःख होणं हे टाळायचं असेल तर परिस्थितीला कशापद्धतीने सामोरं जायचं हे सकाळीच ठरवायला हवं. या छोट्याशा मनाच्या व्यायामानं आपणच आपल्या भावनांकडे सजगपणे बघायला लावेल.

४) स्पार्क शोधायला हवा

अमेरिकेतल्या माझ्या प्रवासात भेटलेल्या स्वतःला आनंदी म्हणवणाऱ्या ७० टक्के लोकांनी आपल्या आयुष्यात किंवा करिअरमधे असे काही बदल केले होते ज्यांना त्यांचं कुटुंब आणि मित्रमंडळ मूर्खपणाचं म्हणेल. या प्रॅक्टिकल नसलेल्या बदलांमुळे त्यांच्या आयुष्यातला स्पार्क त्यांना मिळाला. त्यामुळे आपल्याला वाटत असणाऱ्या अशा भावनांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्यांच्या पाठपुरावा करायला हवा. एखादा लेख वाचून, डॉक्युमेंटरी पाहून किंवा एखाद्या मित्राशी बोलून त्याबद्दलचे वेगळे दृष्टिकोन आपल्याला मिळवता येतील. तुमचं हे ध्येय कसं अशक्य आहे, प्रॅक्टिकल किंवा विवेकी नाहीय अशी कारण देऊ नका. उलट, अशाच भावनांच्या मागे जा आणि त्या तुम्हाला कुठं घेऊन जातायत ते पहात रहा.

# कहै कबीर सुनो भाई साधो

**संत कबीर आणि संत रविदास यांनी आपण धार्मिक नाही आणि अधार्मिकही नाही असं स्पष्ट म्हटलंय. त्यांनी कधीही कोणत्याही धर्माचं सदस्यत्व स्वीकारलं नाही. अनेकदा धर्मातल्या गोष्टींवर टीका केली. असं असलं तरी ते अधार्मिक या पठडीत मोडतील असंही नाही. मग त्यांच्या कार्याचं मूल्यमापन कोणत्या परिभाषेत करता येईल?**

संस्कृती


**डॉ. रविंद्र श्रावस्ती**

बहुजन संतांचं कार्य धर्माच्या चौकटीत बंदिस्त करून बघण्याचा जुना प्रघात आहे. संत कबीर आणि संत रविदास यांनी आपण धार्मिक नाही आणि अधार्मिकही नाही असं स्पष्ट म्हटलंय. 'नाहीं धरमी, नाहीं अधरमी' असा कबीरांचा दोहा प्रसिद्ध आहे. रविदासही धरम– अधरम, मोक्ष नहिं बंधन' असं कबीरांच्या भाषेत तीच भावना व्यक्त करतात. याचा सरळसरळ अर्थ त्यांना अशा कोणत्याही धर्माच्या एका विशिष्ट चाकोरीत बंद करणं म्हणजे त्यांच्या विचार आणि आचार विश्वाचं महत्त्व नष्ट करण्यासारखं आहे. साखी, पदं या स्वरूपात उपलब्ध असलेल्या त्यांच्या साहित्यात ते विशिष्ट धर्माच्या चौकटीत बसतील असे त्यांचे चित्र अजिबात नाही. नाहीतर,

'अरे इन दोउन राह न पाई,
हिंदुन की हिंदवाई देखी
तुरकन की तुरकाई,
कहै कबीर सुनो भाई साधो,
कौन राह हम जाई'

असे कबीर म्हणाले नसते. 'अरे या दोघांना मार्ग कळत नाही, हिंदूंचे हिंदुत्व पाहिले, तुर्कांची म्हणजे मुस्लिमांची तुर्काई, कबीर म्हणे ऐक आणि जाण, कुठली वाट घ्यावी?' असा या पदाचा अर्थ होतो. याचा अर्थ कुठल्याही धर्माची त्यांनी वाट धरली नाही, त्या धर्माचं सदस्यत्व स्वीकारलं नाही. असं असलं तरी ते अधार्मिक या पठडीत मोडतील असंही त्यांचं स्वरूप दिसत नाही.धर्म सदृश्य संकल्पनांचा उद्घोष'नाहीं धरमी, नाहीं अधरमी' या कबीरांच्या काव्याचा मराठी अनुवाद पुढे देत आहे. त्यात कबीर म्हणतात, ' ना मी यती, ना मी कामी हो. ना मी सांगत, ना मी ऐकत, ना मी सेवक – स्वामी हो. बंधनात ना, मुक्तही नाही, विरक्त ना, ना रंगलो. नाही न्यारा कोणापासून, ना कुणाला बिलगलो. स्वर्ग लोकी ना जाऊ आम्ही, नरकही ना आम्हाला हो. सर्व कर्म ते आमचेच खरे, कर्म नि आम्ही न्यारे हो. मत हे कोणा विरळचि उमजे, बैठक त्याची निश्चल हो. कबीर ना स्थापी कसलेही मत, नष्ट करीना कुठले हो.' कबीरांची ही रचना पुरेशी बोलकी आहे. त्यातून अगदी स्पष्ट होतं की ना ते धार्मिक आहेत ना ते अधार्मिकही आहेत. जे लोक धर्मांध किंवा स्वैराचारी आहेत त्यांना माझं मत वेगळं वाटेल, असं कबीर स्पष्टपणे मांडतात. ते कोणत्याच धर्माचे दुराग्रही नसल्यामुळे आणि ते अधार्मिकही नसल्यामुळे त्यांनी कोणतीच कट्टर किंवा विद्धंसक मतं मांडली नाहीत. हे खरं आहे की, धर्म सदृश्य काही संकल्पनांचा उद्घोष त्यांच्या साहित्यात दिसून येतो. पण पारंपारिक हिंदू आणि मुस्लिम धर्मातील संकल्पना आहेत तशा त्या मुळीच नाहीत. त्याचप्रमाणे कपाळाला टीळा किंवा गंध लावणं, दाढी, केस ठेवणं, माळ जपणं, कुंडात स्नान करणं, नदीत पापक्षालनासाठी डुंबणं अशा धार्मिक म्हणवणाऱ्या कोणत्याच गोष्टी त्यांनी केल्या नाहीत. आपल्या पदांत त्यांनी या सगळ्या गोष्टींचा धिक्कारच केलाय.

राम, कृष्ण, अलख,





खालिदला एक करताना

सर्वसाधारणपणे धर्म म्हणजे विशिष्ट ईश्वराचं, अल्लाहचं, देवाचं अस्तित्व मान्य करणं. त्याची पूजा करणं. इबादत करणं. कर्मकांड करणं्. प्रार्थना म्हणणं. प्राण्यांचा बळी देणं. आत्म्याच्या स्वर्ग प्राप्तीसाठी आयुष्यभर विविध मार्गांनी प्रयत्न करत राहणं वगैरे गोष्टी. असा धर्म ते पाळताना दिसतात का? हे आपण समजून घेऊ. कबीर–रविदासांनी पूजाअर्चा, कर्मकांड, बळी किंवा कुर्बानी देणं या धार्मिक गोष्टींना कडाडून विरोध केला होता. त्यांच्या काव्यात याची साक्ष पदोपदी मिळते. त्यांच्या काव्यात वर्णन केलेला तथाकथित ईश्वर किंवा खालिद हा हिंदू किंवा मुस्लिम वर्णन करतात तसा अजिबात नाही. कबीराचं एक पदच बघा. 'मला कुठे शोधतोस? ' असा प्रश्न विचारून कबीरांचा ईश्वर किंवा खालिद म्हणतो, 'बकरीत ना मी मेंढीत नाही, सुरीत ना मी विळ्यात नाही, कातडीत वा शेपटीत नाही, ना मांसांत हाडात नाही, देवळात ना मी, नाही मशिदीत, ना काबा आणि कैलासात, कर्मकांडी ना मी कसल्याही, ना योगी ना वैराग्यात.' याचाच अर्थ हिंदू आणि मुस्लिम धर्मातल्या कुठल्याही ईश्वर संबंधित संकल्पना कबीर स्वीकारत नाहीत. म्हणजेच त्यांचा ईश्वर, खालिद हा पारंपरिक नाही. तो निर्गुण म्हणजे आकार, रंग नसलेला ईश्वर आहे. तसं बघायला गेलं तर त्यांचा खालिदही निर्गुणच आहे. ते अलख, राम, कृष्ण, खालिद, करतार हे एकच आहेत असं म्हणतात. त्यांचं हे म्हणणं विशिष्ट धर्माचं वेगळं अस्तित्व आणि त्याचं स्तोम नाकारणारंच आहे. कबीर आणि रविदासांच्या लेखी वेद, कुराण हे धर्मग्रंथ एकच आहेत. ही एकत्वाची भावना ही निश्चितच धर्माची असू शकत नाही. म्हणून ते म्हणतात की ते कोणत्याही धर्माचे पाईक नाहीत. तसं पहायला गेलं तर ते सेक्यूलर आहेत. ते निष्पक्षही आहेत.

विवेकवादाची जोपासणी

त्यांचं 'आत्मा' या विषयावरचं मतही पारंपरिक नाहीय. रविदासांचं एक वचन आहे,

'आत्मा थिर भई जबै,
तब सबही निधी पाई'

इथं 'आत्मा' या शब्दाचा अर्थ 'मन' या अर्थाने आलाय, हे स्पष्टच दिसतं. जे शास्त्रांचं अंधानुकरण करतील ते नरकात जातील असं संत रविदास एका पदात म्हणतात. इथं नरक यांचा अर्थ अधोगती असाच घेतला पाहिजे. रविदासांनी पारंपरिक शास्त्रांना नकार देऊन विवेकवादाचीच जोपासणी केली नाही का? रविदासांची आणखी एक साखी बघा.

'जा देखे बिन उपजे,
नरक कुंड में वास,
प्रेम भगति सूँ उधरै,
प्रगटत जन रविदास.'

नरकातून सुटका होण्यासाठी विविध धर्म वेगवेगळे उपाय सांगतात. ते सगळं पाप– पुण्याच्या भाषेत मांडलं जातं. पुण्य केलं की स्वर्ग मिळतो आणि पाप केलं की थेट नरकात रवानगी होते, असं धर्म सांगतात. त्या त्या धर्माचे पुरोहित, मुल्ला मौलवी असंच सांगतात.

पण रविदास मात्र 'प्रेम भक्ती'ने उद्धार होईल, पुण्य मिळेल असं सांगतात.

(शोध संत रोहिदासांचा या आगामी पुस्तकातल्या एका लेखाचा संपादित भाग)

# शिवसेनेचे तालुकाप्रमुखपद तुकाराम येवले यांनाच द्या

## सकल धनगर समाज एकवटला; शिवसेना जिल्हाप्रमुखांकडे साकडे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील श्री खंडोबा मंदिरात नवनियुक्त शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांचा




निवडीबद्दल सकल धनगर समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना माजलगाव तालुक्याचे रिक्त झालेल्या तालुका प्रमुखपदी माजी उपनगराध्यक्ष तुकाराम येवले यांचीच निवड करण्याची सर्वानुमते मागणी सकल धनगर समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.



शहरातील श्री खंडोबा मंदिरात नवनियुक्त शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांचा सकल धनगर समाजाच्या वतीने भव्य सत्कार समारंभाचे आयोजन शुक्रवारी सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. याप्रसंगी बीड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती कल्याण आबूज, जि.प.सदस्य प्रा.प्रकाश गवते, बबनराव सरवदे, मल्हार सेनेचे कार्याध्यक्ष अशोकराव डोणे, ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने, सरपंच शंकरराव आबुज, कल्याणराव कसपटे, युवा मल्हार सेनेचे तालुकाप्रमुख संतोष देवकते, यशवंत सेनेचे विजय धायगुडे, अतुल उगले, दासू बादाडे, ओबीसी महासंघाचे तालुकाध्यक्ष शामसुंदर पांचाळ, सुभाष नन्नवरे, नारायण सातपुते, आप्पासाहेब तायडे, विनायक सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिवेसनेचे नवनियुक्त बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव म्हणाले, सकल धनगर समाजाने तुकाराम येवले यांना शिवसेनेचे माजलगाव तालुकाप्रमुख करण्यासाठीचा प्रस्ताव निश्चितच पक्षश्रेंष्ठीकडे सादर करून तुकारामबापू येवले यांनी माजलगाव नगरपरिषदेत नगरसेवक, उपनगराध्यक्षपद भूषविले. या पदाच्या माध्यमातून जनतेची कामे केली, या विषयीही चर्चा करणार असेही जाधव म्हणाले. सकल धनगर समाजाने केलेल्या मानसन्मानाबद्दल आभारही त्यांनी व्यक्त केले. तसेच यावेळी जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती कल्याण आबूज, जि.प.सदस्य प्रकाश गवते, अशोक डोने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सकल धनगर समाजाच्या वतीने तुकाराम येवले यांना शिवसेनेचे तालुकाप्रमुखपदी नियुक्ती करा, अशा आशयाचे निवेदनही देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश हजारे, विकास आबूज, मल्हार कुंडकर, अनिल आव्हाड, दत्ता शेळके, राजू काळे, भागवत गायकवाड, गोपाळ कुंडकर, तुळशीराम धरपडे, विनायक सोनटक्के, सुखदेव मुळे आदींनी मेहनत घेतली.

## रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलचे पदग्रहण

### अध्यक्षपदी गजेंद्र खोत, सचिवपदी रणजित राठोड

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरात पाच वर्षापूर्वी स्थापन झालेल्या रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलच्या अध्यक्षपदी शहरातील वास्तूविशारद इंजि.गजेंद्र खोत यांची, तर सचिवपदी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत रणजित राठोड यांची २०२१-२२ या वर्षासाठी निवड करण्यात आली.


गजेंद्र खोत


रणजित राठोड

मावळते अध्यक्ष डॉ.शिवाजीराव काकडे व सचिव निलेश काटकर यांच्याकडून नूतन अध्यक्ष गजेंद्र खोत व सचिव रणजित राठोड यांनी औपचारिकरित्या पदभार स्वीकारला. क्लबच्या वतीने यावर्षी आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर, मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर लसीकरण प्रबोधन शिबिर तसेच गरीब, होतकरू विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक साहित्य वाटप, शहरात बसस्थानक परिसरात, मंदिर परिसरात वृक्षलागवड व संवर्धन त्याचप्रमाणे पर्यावरण पूरक कार्यक्रमांतर्गत रेन वॉटर हार्वेस्टिंग व परसबाग इत्यादी उपक्रम रोटरीमार्फत राबवण्याचा मनोदय गजेंद्र खोत, रणजित राठोड यांनी व्यक्त केला.

गजेंद्र खोत व रणजित राठोड या दोघांचेही सामाजिक कार्यात मोठे योगदान राहीलेले आहे. आता रोटरीच्या माध्यमातून हे कार्य वृद्धींगत होणार असल्याचे दिसत आहे.

# प्रामाणिकपणे कार्य केल्यास यश शक्य : प्रकाश सोळंके

## पवारवाडी येथे देवदया बायो डिझेल पंपाचे उद्‌घाटन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : प्रामाणिकपणे आणि ध्येय डोळ्यासमोर ठेवून काम केल्यास कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येते. ही बाब बालासाहेब जाधव यांनी उद्योगात आणि अप्पासाहेब जाधव यांनी राजकारणात यशस्वी होवून सिध्द केली आहे. असे गौरवोद्गार माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी काढले. ते पवारवाडी येथे देवदया बायो डिझेल पंप उद्घाटन प्रसंगी बोलत होते.



या कार्यक्रमात आपले शुभआशीर्वाद देण्यासाठी आमदार प्रकाश सोळंके यांच्यासह जय महेश साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर गिरीष लोखंडे, शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके, बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ, सतिष रांजवण, अच्युतराव लाटे, रामराव जाधव, विष्णू खेत्री, अविनाश गोंडे, सुनिल खामकर, सरपंच अनुप घाडगे, भालचंद्र सोळंके, नगरसेवक रोहन घाडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, चिकाटी, जिद्द, मेहनत आणि इमानदारी अंगात असेल तर, व्यवसायात व राजकारणात यशस्वी होता येते. ही गोष्ट बालासाहेब जाधव आणि आप्पासाहेब जाधव या दोन्ही बंधूंनी आपल्या व्यवसायातून आणि राजकारणातून सिद्ध करून दाखवले, असल्याचेही आमदार सोळंके म्हणाले. मंगळवार, दिनांक २९ जून रोजी माजलगावच्या सेवेत नव्याने, लोकांची मागणी लक्षात घेता बाळासाहेब बाजीराव जाधव यांच्या देवदया बायो डिझेल पंपाचे उद्घाटन तालुक्यातील नागरिकांच्या उपस्थितीत, कोरोना नियमांचे पालन करत, मोठ्या थाटात करण्यात आले. सदरील उद्घाटनाचा कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. देवदया बायो डिझेल पंपाचा वाहनधारकांना निश्चितच मोठा फायदा होईल. असे आलेल्या पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## एपीआय प्रभा पुंडगे यांचा सत्कार



दिंद्रुड : येथील पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पुंडगे यांचा सत्कार करताना चाटगावचे उपसरपंच बालासाहेब केकान, उद्योजक धनराज सांगळे, सामाजिक कार्यकर्ते दीपक गडसिंग, रामभाऊ चौरे.

# 'माजलगावला कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी द्या'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : जिल्हा प्रशासनाच्या येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाला सहा महिन्यांपासून प्रभारी अधिकारी असल्यामुळे विविध प्रकरणे प्रलंबित असून वकील, पक्षकार, शेतकऱ्यांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहे. या संदर्भात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने प्रभारी उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे यांना निवेदन देऊन कायमस्वरूपी अधिकारी उपलब्ध करण्याबाबत विनंती केली आहे.



कुठलेही काम होत नसल्या कारणामुळे सर्वसामान्य नागरिक हतबल झाला असून, प्रभारी अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार असल्यामुळे माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कामे खोळंबून पडली आहेत. या संदर्भात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने प्रभारी उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे यांना निवेदन देऊन कायमस्वरूपी अधिकारी उपलब्ध करण्याबाबत विनंती केली आहे. १६ जुलैपर्यत शासनाने माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांची कायमस्वरूपी नेमणूक न केल्यास शेकापच्या वतीने कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे शेकापचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील,ॲड.अखिलेश घाडगे, लहू सोळंके, मुंजा पांचाळ, समाधान पौळ, सुदाम चव्हाण, व्यंकट खुळे, राहुल मापाडे, राजेश्वर मोरे, शेख राजू, अनिल कदम, ज्ञानदेव आंधळे, सिद्धेश्वर गायकवाड आदींनी दिला आहे. येत्या १६ जुलैपर्यंत याठिकाणी कायमस्वरूपी अधिकाऱ्याची नेमणूक न केल्यास शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने अन्नत्याग आंदोलनाचा इशारा दिला आहे.




# मराठा आरक्षणासाठी धरणे आंदोलन

## भाजपा नेते रमेश आडसकर यांचे नेतृत्व

▶ प्रतिनिधी

माजलगाव : मराठा आरक्षणासाठी मंगळवारी भाजपचे नेते रमेश आडसकर यांच्या नेतृत्वात शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकातून मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला सुरुवात झाली. यानंतर येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी या आंदोलनात राजाभाऊ मुंडे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरूण राऊत, बबनराव सोळंके, ज्ञानेश्वर मेंडके, डॉ.भगवानराव सरवदे, डॉ.अशोक तिडके, बबनराव सिरसट, गोरख धुमाळ, शिवाजी मायकर, सुनील शिनगारे, ऋषिकेश आडसकर, हनुमान कदम, अनंत जगताप, मच्छिंद्र झाटे, डॉ.प्रशांत पाटील, ॲड.सुरेश दळवे आदी मराठा बांधव सहभागी होते. 'मराठा समाज आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून त्यांना आरक्षणाची गरज आहे. म्हणून मराठा समाजाला आरक्षण गरजेचे आहे. जर मराठा समाजाला आरक्षण दिले नाही तर यापुढे तीव्र आंदोलन करण्यात येईल. ठाकरे सरकारने याची दखल घ्यावी', असे भाजप नेते रमेशराव आडसकर यांनी धरणे आंदोलातून सांगितले.



### टिसी हरवला आहे

दिक्षा अशोक निसर्गंध, रा.हारकी निमगाव ता.माजलगाव, जि.बीड यांचा हारकी निमगाव ते माजलगाव प्रवासादरम्यान ७ वी पासचा टिसी हरवला आहे. तरी कोणाला सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क : ९७६४२१२३६४

वर्तमान
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

# अप्पासाहेब जाधव-धनंजय सोळंके वादावर पडदा

## शिवसेना नेते चंद्रकांत खैरेंची शिष्टाई यशस्वी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शिवसेना नेते चंद्रकांत खैरे आणि जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी मला शिवसेना पक्षातील कार्यपद्धती वरिष्ठांच्या नात्याने चांगल्या प्रकारे समजावून सांगितली आहे. नूतन जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव व माझ्यातील गैरसमज, वाद हे मिटले आहेत. शिवतीर्थावरील आंदोलन आपण मागे घेत असून यापुढे पक्ष वाढीसाठी प्रयत्न करत राहणार असल्याचे माजलगाव शहरप्रमुख धनंजय सोळंके यांनी म्हटले.



शिवसेना कार्यकारिणीतील फेरबदलानंतर नूतन जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव व माजलगाव शहरप्रमुख धनंजय सोळंके यांच्यातील वाद हा विकोपाला गेला होता. शाई टाकण्याच्या प्रकारानंतर सोळंके यांना जाधव गटाकडून मारहाण झाली होती. राज्यभर याची चर्चा झाल्यानंतर आता शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या प्रयत्नांतून सोळंके व जाधव यांच्यातील तणाव दूर करण्यात आला आहे. खैरे यांची भेट घेतल्यानंतर सोळंके यांनी पत्रक देत म्हटले की, नूतन जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव व माझ्यातील वाद शिवसेना नेते चंद्रकांत खैरे व जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी मिटवला आहे. 'मी जे शिवतीर्थावर आंदोलन करणार होतो ते रागाच्या भरात करण्याचे जाहीर केले होते. ते आंदोलन मी आता मागे घेत आहे. यापुढे नूतन जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव व आपण यापुढे शिवसेनेत एकदिलाने काम करणार आहोत. मी कालही स्व.बाळासाहेबांचा कट्टर शिवसैनिक होतो, आजही आणि उद्याही राहील. यापुढेही मी शिवसेना वाढीसाठी काम करणार' असल्याचे धनंजय सोळंके यांनी म्हटले आहे.



### झालेल्या प्रकाराबाबत दिलगिरी : जाधव

माजलगावात शहरप्रमुख सोळंके यांना शिवसैनिकांनी केलेली मारहाण हा प्रकार चुकीचा होता. त्या प्रकाराबद्दल आपण दिलगिरी व्यक्त करत आहोत. यापुढे सोळंके यांच्या साथीने माजलगावात शिवसेना वाढीसाठी आपण काम करू, अशी प्रतिक्रिया नूतन जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी दिली.

# निष्क्रिय केंद्र सरकारचे धोरण हाणून पाडा

## जि.प.सभापती जयसिंग सोळंके यांचे टीकास्त्र; इंधन दरवाढी निषेधार्थ रास्ता रोको आंदोलनाला प्रतिसाद

▶ प्रतिनिधी

माजलगाव : केंद्रात सत्तारूढ असलेल्या मोदी सरकारने गरीबांना केवळ आश्वासने देवून झुलवत ठेवले आहे. आजमितीला इंधनाचे भाव गरीबांना न परवडणारे आहेत. एकीकडे केवळ आश्वासने द्यायची आणि दुसरीकडे गरिबांची पिळवणूक करायची असे धोरण मोदी सरकारने आखले आहे, ते हाणून पाडण्याची गरज असून थापाड्या केंद्र सरकारचा करावा तेवढा निषेध कमीच आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादीचे नेते तथा बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके यांनी केंद्र सरकार टीकास्त्र सोडले. ते रविवारी माजलगाव येथे रास्ता रोको आंदोलनाप्रसंगी बोलत होते.

पेट्रोल, डिझेल, गॅस आदी इंधनाचे दर आकाशाला भिडले आहेत. इंधनाची दरवाढ करणाऱ्या केंद्र सरकारच्या धोरणाच्या निषेधार्थ रविवार, दि.४ जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांनी केले. यावेळी जि.प.सभापती कल्याण आबूज, पं.स.सभापती भागवत खुळे, बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन एन.टी.सोळंके, जि.प.सदस्य प्रा.प्रकाश गवते, ॲड.शरद चव्हाण, विश्वांभर थावरे, ॲड.प्रमोद तौर, नगरसेवक भागवतराव भोसले, दयानंद स्वामी, कचरू खळगे, मनोहर डाके, नासेर खाँ पठाण, सिध्देश्वर गोळेकर, भगवान कदम, रूख्मानंद खेत्री, सुनिल शिंदे, संतोष काळे, राजू कुरेशी, अनवर पटेल, लतिफ नाईक आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना जि.प.सभापती जयसिंग सोळंके म्हणाले, गरिबांच्या हिताआड येणारे केंद्र सरकार केवळ आश्वासनांची खैरात करत आहे. वास्तविक पाहता विकासाच्या नावाखाली देश भकास होत आहे. कोरोना काळातही राज्य सरकार प्रभावी काम करत असताना केंद्र सरकारचे पाहीजे तेवढे सहकार्य मिळत नाही, असा आरोपही सोळंके यांनी केला.







### 'केंद्र सरकारचा निष्क्रिय कारभार गरिबांच्या मुळावर'

आंदोलनाचे नेतृत्व करणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके म्हणाले, केंद्राच्या कुचकामी धोरणामुळे गरिबांचे हाल होत आहेत. इंधन दरवाढीमुळे अक्षरशः गरिबांचे कंबरडे मोडले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने सत्तेत राहण्याचा नैतिक अधिकार गमावलेला आहे. जनतेला अच्छे दिनचे स्वप्न दाखवून उद्योगपतींना खूश करणारे निर्णय घेणारे हे सरकार असून इंधन दरवाढीस जबाबदार असणाऱ्या अशा निष्क्रीय केंद्र सरकारचा राष्ट्रवादी काँग्रेस निषेध करते.

# वाळूसाठ्याचे गौडबंगाल काय?

## ५० ब्रास वाळू असल्याचा महसूल विभागाचा दावा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील गंगामसला येथे गोदावरी पात्रात व आजूबाजूला चोरून जमा केलेल्या वाळूसाठ्यावर तहसीलदार वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने रविवारी पहाटे कारवाई केली. यावेळी या ठिकाणी ५० ब्रास वाळूसाठा जप्त केला. दरम्यान, महसूल विभागाने ५० ब्रास वाळू जप्त केल्याचा दावा केला असला तरी ग्रामस्थांना मात्र याबाबत संशय असून ५० ब्रासपेक्षा अधिक वाळू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

लिलाव नसताना गंगामसला येथे बेकायदेशीर वाळूउपसा सुरू होता. रविवारी पहाटे तहसीलदार वैशाली पाटील यांच्या पथकाने गंगामसला येथे वाळूसाठ्यावर अचानक छापा टाकला. यावेळी गोदापात्रात व आजूबाजूच्या परिसरात रविवारी दुपारपर्यत ५० ब्रास वाळू जप्त केली होती.

या वाळूची किंमत सुमारे अडीच लाख रूपये आहे. माजलगाव तहसिलच्या पथकामार्फत वाळूसाठे शोधमोहीम सुरू आहे. रविवारच्या कारवाईत तहसीलदार वैशाली पाटील, मंडळाधिकारी पद्माकर मुळाटे, तलाठी एस.व्ही.शिलवंत, एस.एस.गोरे, कोतवाल केरबा तपसे यांनी सहभाग घेतला. एकीकडे महसूल विभाग पन्नास ब्रास वाळू जप्त केल्याचा दावा करत आहे.

दुसरीकडे ग्रामस्थांना याबाबत संशय आहे. अशा परिस्थितीत गंगामसल्यातील वाळूसाठ्याचे गौडबंगाल काय? असा सवाल ग्रामस्थ विचारित आहेत. दरम्यान, या प्रकरणाची वरिष्ठांनी कसून चौकशी करावी अशी मागणीही जोर धरत आहे.

# संजिवनी हॉस्पिटलने सेवेतून नावलौकिक करावे

## आमदार प्रकाश सोळंके यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले संचलित संजिवनी हॉस्पिटलने भविष्यात आपल्या सेवेच्या माध्यमातून किर्ती वाढवावी, नावलौकिक करावे असे प्रतिपादन आमदार प्रकाश सोळंके यांनी केले. ते गुरूवारी संजीवनी हॉस्पिटल ॲण्ड क्रिटीकल केयर सेंटरच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.प्रकाश आनंदगावकर यांची तर भागवताचार्य ह.भ.प.पुरूषोत्तम महाराज कोटुळे, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, जिल्हा परिषद सभापती जयसिंग सोळंके, माजी आमदार मोहनराव सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, डॉ.गजानन देशपांडे, डॉ.श्रेयश देशपांडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीस भगवान धन्वंतरीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. आमदार प्रकाश सोळंके पुढे बोलताना म्हणाले, माजी सैनिक विठ्ठलराव गिलबिले यांनी देशाची सेवा केली नंतर ते लोकनेते सुंदररावजी सोळंके कारखान्यात सुरक्षारक्षक म्हणून कामही पाहिले आहे. ते आमच्या परिवारातील एक सदस्य आहेत. तसेच त्यांचे चिरंजीव डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले एमबीबीएस सारखे शिक्षण घेतले. खरे तर त्यांना इतरत्र एखाद्या मोठ्या शहरात काम करण्यासाठी संधी मिळाली असती, मात्र त्यांनी या समाजाचे आपण काहीतरी देणेकरी लागतो या भावनेतून माजलगाव शहरात अद्ययावत असे सुसज्ज हॉस्पिटल उभारले. किडनी केअर व डायलिसिस, एन्डोस्कोपी सारख्या या सुविधा ग्रामीण आपल्या शहरात सुरू केल्या, याचा मला अभिमान वाटतो.





तसेच सर्वसामान्य रूग्णांना अल्पदरात सेवा डॉ.गिलबिले यांनी द्यावी अशी अपेक्षा आमदार सोळंके यांनी व्यक्त करत पुढील कार्यास त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ.प्रकाश आनंदगावकर यांनीही आपले मार्गदर्शनपर भाषण केले. तसेच प्रास्ताविकपर भाषण डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतिष सावंत तर आभार नवनाथ गिलबिले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल सरोदे, नवनाथ शेरकर, विजयकुमार सोलापुरे यांनी मेहनत घेतली. संजीवनी हॉस्पिटलच्या शुभारंभानिमित्त डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले यांना सर्व स्तरातून अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

### भाजप नेत्याचे अभिष्टचिंतन



दिंद्रुड : ज्येष्ठ पत्रकार तथा भाजप नेते बंडू खांडेकर यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना उद्योजक प्रदीप ठोंबरे, समाधान सोळंके, पत्रकार अमोल ठोंबरे, प्रविण सोळंके.

# शिक्षकीपेशा हे जगण्याचे व्रत : प्रदीप भिलेगावकर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शिक्षकी पेशा हे व्रत मानूनच सेवा केली. मुख्याध्यापक पद हे सर्वांना सोबत घेवून जाण्याचे पद मी गेली साडेपाच वर्ष सांभाळले आहे. माझ्या जडण घडणीत नवविकास मंडळ शिक्षणसंस्थेचा मोलाचा वाटा आहे. संस्थेचा ध्येयवाद हाच माझ्या जगण्याचा मुख्य स्त्रोत माणल्या मुळे सेवा सफल संपूर्ण करु शकलो, असे प्रतिपादन सेवापूर्तीच्या गौरव कार्यक्रमात सत्कारमूर्ती मुख्याध्यापक प्रदिप भिलेगावकर यांनी व्यक्त केले.



महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभाकर साळेगावकर हे होते तर संस्थेच्या सदस्या सुनिता रंगनाथ भिलेगावकर, जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिमन्यू इबिते, व्ही.एन.कुलकर्णी, संतोष जोशी, सुमंत गायकवाड, मोरेश्वर मसलेकर, सुनिता धसकटे, अल्का प्रदीप भिलेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अनंत भालेराव सभागृहात बुधवार,३० जून रोजी या कार्यक्रमाची सुरूवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. सुमंत गायकवाड, अभिमन्यू इबिते यांनी मनोगतात प्रदिप भिलेगावकर यांच्या विषयी गौरवोद्गार काढताना अनेक आठवणी सभागृहासमोर मांडल्या. नवविकास मंडळ शिक्षण संस्थेतील तीनही विद्यालयाच्या वतीने प्रदीप भिलेगावकर यांचा सपत्निक सत्कार झाला. मानपत्राचे वाचन ओमप्रकाश दायमा यांनी केले. १ जुलै पासूनच्या नूतन मुख्याध्यापिका सुनिता धसकटे-कदम यांचे स्वागत झाले. विद्यार्थीनी कु.प्रणिती अमर साळवे आणि पालक अमर साळवे यांनी प्रदीप भिलेगावकर यांचा सत्कार केला. समारंभ यशस्वीतेसाठी, सुमेध घाडगे, राजाभाऊ शिवणकर, धोंडीराम रामुळे, प्रविण काळे, विक्रम करडखेले, उषा राठोड, सुषमा देडे, शेख मतीन, जोत्स्ना कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. उर्मिला झांबरे यांनी छान सुत्रसंचलन केले तर सांगुळे सर यांनी आभार मानले.

# नूतन शिवसेना जिल्हाप्रमुखांचे सर्वत्र जल्लोषात स्वागत



परळी



अंबाजोगाई



केज



सिरसाळा



धारुर



माजलगाव

माजलगाव : नूतन शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब कडाजीराव जाधव यांचे विविध ठिकाणी जल्लोषात स्वागत झाले आहे. याप्रसंगी सिरसाळा, परळी, अंबाजोगाई, केज, धारूर येथील पदाधिकारी, शिवसैनिकांनी नवनियुक्त जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांचा सत्कार केला. तर शेवटच्या छायाचित्रात वर्तमान कार्यालयात अप्पासाहेब जाधव यांचा सत्कार करताना संजय महाद्वार, तुकाराम येवले, रामराजे सोळंके, सुनिलराव खंडागळे, शिवाजीराव चव्हाण, महादेव सुरवसे, वर्तमानचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी.






आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.